मराठी वृत्तपत्रातील महिला विषयक वार्तांकनाचा संवादशास्त्रीय अभ्यास
(दै. लोकमत, दै. सकाळ व दै. प्रजावणीच्या विशेष संदर्भात)
कालखंड २०२३ ते २०२४

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर विद्याशाखेत अंतर्गत जनसंवाद आणि वृत्तपत्र विद्या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर केलेला संशोधन पूर्व आराखडा

संशोधिका
अश्विनी शामराव केवटे
एम. जे. एम. एस., एम. फील. (मीडिया स्टडीस)

मार्गदर्शक
प्रा. डॉ. सुहास दुर्गादासराव पाठक
(सहयोगी प्राध्यापक)
माध्यमशास्त्र संकुल
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.

संशोधन केंद्र
माध्यमशास्त्र संकुल
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.

अनुक्रमणिका

प्रकरण	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्रमांक
१	प्रस्तावना	३
२	संशोधन पद्धती	६
३	मराठी वृत्तपत्रातातिल महिला विषयक वार्तांकन	९
४	दै. लोकमत, दै. सकाळ व दै. प्रजावाणी मधील महिला विषयक वार्तांचे आशय विश्लेषण	११
५	सामाजिक पाहणीचा अहवाल	१२
६	निष्कर्ष व सूचना	१३
❖	संदर्भग्रंथ सुची	१४

मराठी वृत्तपत्रातील महिला विषयक वार्तांकनाचा संवादशास्त्रीय अभ्यास (दै. लोकमत, दै. सकाळ व दै. प्रजावणीच्या विशेष संदर्भात) कालखंड २०२३ ते २०२४

प्रस्तावना :

जगाच्या एकूण लोकसंख्येच्या निम्मी लोकसंख्या ही स्त्रीची असून देखील स्त्रियांना आजही कुटूंबात व समाजात समानतेची वागणूक न देता दुय्यम स्थान दिले जाते भारत हा अति प्राचीन देश आहे. सिंधू संस्कृती ही भारतीय समाजाची आद्य संस्कृती मानली जाते. स्त्री पुरुष हा भेद निसर्गाने निर्माण केलेला आहे दोघांमधील ही भिन्नता मान्य करूनही स्त्री ही मानव आहे आणि सजीव प्राण्यांमध्ये अग्रस्थानी आहे मानव म्हणून स्त्री आणि पुरुष यांच्यात विभिन्नते पेक्षा प्रमाणात साम्य आहे ही वस्तुस्थिती पुष्कळ वेळा समाजामध्ये मान्य केली जात नाही.

सुरुवातीच्या काळात स्त्री-पुरुष विषमतेच्या विचारच नव्हता कारण स्त्री-पुरुषांमध्ये कोणतेच बंधन नव्हते त्यामुळे स्त्री मुक्त कोणापासून हा प्रश्न नव्हता. मानसिक व बौद्धिक दृष्टीने स्त्री पुरुषापेक्षा कनिष्ठ आहे असे मानले जात नव्हते. सर्वच क्षेत्रात स्त्रियांचा मुक्त संचार होता खिस्तपूर्व व १२ व्या शतकात सुद्धा स्त्रिया न्यायाधीश, योद्धे भविष्यवेत्या असल्याचे उल्लेख आढळतात. सुरुवातीच्या काळात अरेबियातील मुसलमान स्त्रियां सुद्धा पुरुषांच्या बरोबरीने काम करीत होत्या परंतु कालांतराने या परिस्थितीत बदल झाला. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांना अनेक बंधनात जखडून पवित्रयाच्या कल्पनेची शिकार बनलेल्या गेले. तिला शिक्षणापासून वंचित करण्यात आले विवाहासाठी जोडीदार निवडण्याचे अधिकार हिसकावून घेण्यात आले. धार्मिक व सामाजिक उत्सवात भाग घेण्यास बंदी घालण्यात आली बहुपत्नीत्वाची प्रथा रूढ करून प्रतिष्ठेच्या सापळ्यात तिला अडकविण्यात आले सती प्रथा रूढ करून पतिव्रतेच्या खोट्या कल्पनेवर तिला जिवंत जाळण्याची प्रथा अस्तित्वात आणली . शारीरिक पवित्रा चे अवाजवी महत्त्व वाढविण्यात

आले वयात येण्यापूर्वीच विवाह करून मोकळं होण्याची स्पर्धा सुरू झाली एकंदरीत भारतीय स्त्रियांना अनेक समस्या समस्यांशी जेरबंद करण्यात आले

आधुनिक काळात समाजात स्त्रीवरील अन्याय, अत्याचार मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. त्या संदर्भातील बातम्या आपण रोजच वृत्तपत्रात वाचत असतो. या वाढत्या हिंसाचाराचे कारण स्त्रियांना समाजात मिळणार दुय्यम दर्जा होय. या पुरुषी श्रेष्ठत्वाची, सत्तेची जाणीव करून देण्यासाठी पुरुष स्त्रियांवर अत्याचार करतात त्यामध्ये फक्त पुरुषच स्त्रीवर अत्याचार करतात असे नसून बरेचदा स्त्रीसुद्धा स्त्रीवर अत्याचार करण्यास पुरुषांना मदत करते. त्यामुळे स्त्रियांना कितीही हक्क किंवा कायद्याचे संरक्षण असले तरी तिच्यावर होणारे अन्याय , अत्याचार आणि हिंसाचाराचे प्रमाण वाढतच आहे. अशा अनेक कारणांमुळे स्त्रियांना समाजात मिळणारे दुय्यम स्थान आणि त्यांची होणारी पिळवणूक याविषयी कुलकर्णी लीना म्हणतात, "मानव म्हणून स्त्री आणि पुरुष यांच्यात विभिन्नते पेक्ष्या अधिक प्रमाणात साम्य आहे. ही वस्तुस्थिती पुष्कळ वेळा समाजामध्ये मान्य केली जात नाही तसेच आपण पुरुषांपेक्षा मागे आहोत याचे स्त्रियांवर दडपण येते स्त्री-पुरुषांच्या शारीरिक भिन्नतेला जे अर्थ दिले, त्यामुळे स्त्रियांची पिळवणूक होते."

स्त्रीवरील अन्याय अत्याचाराबाबत सुरुवातीपासून वृत्तपत्रांनी लिखाणाच्या माध्यमातून समाज जागृती घडवून आणण्याचे काम केले. तेव्हा बदलत्या काळानुसार स्त्रियांवरील अत्याचारांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन त्यांची कारणमीमांसा करण्याच्या दृष्टिकोनातून वृत्तपत्रांची भूमिका बदललेली आहे काय? आधुनिक काळातील वृत्तपत्रे आज स्त्रियांवरील अत्याचारांच्या बाबतीत किती जागरूक आहेत? हे जाणून घेण्याच्या दृष्टिकोनातून "दैनिक लोकमत, दैनिक सकाळ आणि दैनिक प्रजावणी या मराठी वृत्तपत्रातील महिला विषयक वार्तांकन नांदेड जिल्ह्याच्या विशेष अभ्यास" (कालखंड २०२३ ते २०२४) या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

एखाद्या स्त्रीच्या खाजगी किंवा सामाजिक अथवा सार्वजनिक जीवनात केवळ स्त्री आहे म्हणून केलेले असे वर्तन किंवा कृती ज्यामुळे तिचा स्वातंत्र्यावर गदा येत असेल किंवा येण्याची शक्यता असेल तर 'स्त्री अत्याचार' असे म्हणतात भारतात अगदी प्रारंभापासून पुरुषाने प्रभुत्व मिळवून कुटुंब व समाज जीवनात स्त्रियांचे स्थान कनिष्ठ बनविले आहे. स्त्रियांना समाजात असणारे कनिष्ठ स्थान हेच तिच्या दुर्बलतेचं मुख्य कारण आहे.

पूर्ण जगात भारत देश आपली संस्कृती परंपरा अध्यात्म व भौगोलिक विविधता यामुळे ओळखला जातो. ही नाण्याची एक बाजू आहे. पण हाच देश जगभर पुरुष प्रधान संस्कृती साठी प्रसिद्ध आहे. तसे बघितले तर भारतात महिलांना आदिशक्तीचे रूप मानून पुरातन काळापासून पूजनीय मानले गेले आहे त्याचवेळी याच भारत देशात महिला घरात आणि समाजातही बंधनात अडकून पडल्या आहेत. वास्तविक त्यांना घरात आणि समाजातही दुय्यम स्थान दिले जाते आणि फक्त स्त्री-पुरुष समानतेच्या गोष्टी बोलल्या जातात. महिलांच्या स्वतंत्र व अधिकाराविषयी कळकळ व्यक्त केले जाते. असे असले तरी खैरलांजी आणि निर्भया , अशिफा असे अमानुष अत्याचाराच्या घटना घडतात आणि अशावेळी आपल्या समोर महिलांचे प्रश्न बिकट समस्या बनून उभे राहतात. यावर उपाययोजना म्हणून महिलांसाठी अनेक कायदे आहेत. तसेच महिलांना स्वायत्तता, सुरक्षा, संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाचे अभियान राबविले जातात. तरी महिलांच्या समस्या कायम आहेत म्हणून एक प्रश्न उपस्थित करावासा वाटतो. भारतातील महिलांचे खरंच सबलीकरण होत आहे का ? आपल्या आजूबाजूला किती महिला सक्षम आहेत ? की आजही त्या पूर्णपणे स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकतात ? किती महिला आर्थिक स्वावलंबी झाल्यात आपल्या स्वतःच्या कुटुंबातच त्या किती सुरक्षित आहेत? अश्या किती तरी प्रश्न व त्यांची उत्तरे अजून अनुत्तरित आहेत. अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या संशोधनात केला जाणार आहे.

वास्तविकतेत महिलांना त्यांच्या क्षमतांची ची जाणीव करून वैयक्तिक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा अधिकार होय. महिला या देशांच्या भविष्य ठरविणारी शक्ती आहे आणि त्यामुळे ही शक्ती सुदृढ व सक्षम बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे. आपल्या देशाची अर्धी लोकसंख्या हि महिलांची आहे. महिलांसाठी मातृदिवस, महिला दिन, बालिका दिन जननी सुरक्षा अभियान असे कार्यक्रम राबविले जातात. त्यामुळे समाजात स्त्री शक्तीचे महत्त्व व अधिकार जागृत करण्याचे काम केले जाते. पण यासोबत आज महिला सबलीकरण करताना सर्वप्रथम समाजात महिलांचे अधिकार व मूल्य यांच्यावर घात करणाऱ्या विघातक

प्रवर्ति अर्थात हुंडा प्रथा, स्त्रीभ्रूणहत्या, निरक्षरता, लैंगिक अत्याचार , असमानता इत्यादींचा नाश करणे गरजेच आहे. लैंगिक भेदभाव नष्ट करून समानता प्रस्थापित करणे, तसेच सामाजिक घरगुती अन्याय व अत्याचार यांच्याविरुद्ध कठोर कायदे व उपायोजना करणे, आर्थिक व मानसिक स्वरूपात सशक्त बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे. अशानेच महिलांचे खऱ्या अर्थाने सबलीकरण होईल.

प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती

वृत्तपत्र हे माध्यम समाजाशी निगडीत असल्यामुळे त्यांचा समाजात न्यायव्यवस्था रुजविण्यासाठी उपयोग केला जात असल्यामुळे विषय सामाजिक शाश्त्राशी निगडित आहे. त्यासाठी मराठी भाषेतील दोन प्रमुख वृत्तपत्रे दैनिक लोकमत व प्रजावणी च्या वार्तांकनाचा अभ्यास करून आशय विश्लेषण तंत्रांचा वापर करून तथ्य संकलन करणारा आहे. त्याचप्रमाणे स्त्री हिंसाचार विरोधी जागरूकता निर्माण करण्यासाठी वृत्तपत्र या माध्यमाचा कार्यकारणभाव शोधून काढण्याचा प्रयत्न संशोधनात केला जाणार आहे.

समाजात घराबाहेर होणारे अत्याचार तर घरात होणारे अत्याचार तितकेच हिंसक असतात. भारतातील कौटुंबिक हिंसाचाराची आकडेवारी त्यामध्ये नॅशनल क्राईम रेकॉर्ड

ब्युरो तर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या क्राईम इन इंडिया- २०१८ मध्ये महिला अत्याचारांचे एकूण तीन लाख ७८ हजार २७७ गुन्हे नोंदविण्यात होते २०१७ मध्ये तीन लाख ५९ हजार ८४९ गुन्हे नोंदविण्यात आले होते शिवाय २०१६ मध्ये तीन लाख ३८ हजार ९५४ गुन्हे नोंदविण्यात आले होते इत्यादी मुद्यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधन पद्धती असे असून या प्रकरणात संशोधन म्हणजे काय ते सांगून सामाजिक संशोधनाच्या व्याख्या सामाजिक संशोधनाचे महतत्त्व संशोधन विषयाची निवड व महतत्त्व संशोधनाचे उद्देश संशोधनासाठी ची गृहीतके मांडण्यात आली आहेत.

संशोधन विषयाचे महत्त्व :

भारतातील प्राचीन काळापासूनच स्त्रियांवर अत्याचार होत आहेत ते आजही होताना दिसतात. प्रत्येक क्षेत्रात पुढे असणाऱ्या महिला व मुलींसाठी कितेक कायदे करण्यात आले त्या स्वतः सुद्धा काही प्रमाणात त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचार हिंसाचाराचा प्रतिकार करताना दिसतात तरी सुद्धा भारतातील स्त्री ही सुरक्षित नाही. म्हणून नांदेड जिल्ह्यातील महिला विषयक वार्तांकन (**दै. लोकमत, दै. सकाळ व दै. प्रजावणी** मधील बातम्यांचा तुलनात्मक अभ्यास कालखंड २०२३ ते २०२४).\ या विषयावर संशोधन करताना काही उद्दिष्ट समोर ठेवून संशोधन करण्यात आले ते पुढील प्रमाणे :

१ महिलांवरील अत्याचार या संबंधी वृत्तपत्रांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

२ महिलांवरील अत्याचारांचे वृत्तपत्रात चित्रण कसे केले जाते याचा शोध घेणे.

३ महिलांवरील अत्याचारांची स्वरूप व प्रमाण अभ्यासणे.

४ महिला अत्याचारामागील कारणांचा शोध घेणे.

संशोधनाचे उद्दिष्टे :

१. महिला अत्याचारांचे स्वरूप समजावून घेणे.

२. कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा - २०१३ संदर्भात अभ्यास करून सर्वेक्षण करणे.

३. भारतीय दंड विधान कायदा (सुधारित) २०१३ मधील तरतुदींचा अभ्यास करणे.

प्रस्तुत विषयावरील संशोधन साधारणत : पुढील ५ गृहीतके समोर ठेवून करण्यात आले आहे.

१. महिला सुरक्षा संदर्भात कठोर उपाययोजना अत्यल्प आहेत

२. स्त्री अत्याचारचे वर्तमानपत्रतील चित्रण अतिरंजित असल्याचे आढळते.

३. महिलांवर होणारे अत्याचार कुटुंब केंद्रित असल्याचे दिसून येतात.

४. स्त्रियांचा दुय्यम दर्जा त्याच्यावरील अत्याचारास कारणीभूत ठरतो.

५. स्त्रियांवरील अत्याचारात शारीरिक व मानसिक छळाचे प्रमाण अधिक आहे

प्रस्तुत प्रबंधात दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व दैनिक प्रजावणी या मराठी वृत्तपत्रातील महिलाविषयक वार्तांकन: नांदेड जिल्याचा विशेष अभ्यास" (कालखंड २०२३ ते २०२४)

संशोधन आराखडा :

संशोधन आराखडा तयार करताना संशोधन हे वैज्ञानिक पद्धतीने होण्यासाठी निश्चित असा संशोधन आराखडा ची आवश्यकता असते. संशोधनातील निष्कर्ष शास्त्रांच्या कसोटीला उतरतात. संशोधनात निश्चित उद्दिष्टांचा प्राप्तिसाठी आराखडा तयार केला जातो. संशोधन विषयातील अडचणीचा विचार पूर्वक अंदाज घेऊन या अडचणींचे निरसन

करण्याचा दृष्टीने हे संशोधन आराखडाची आवश्यकता असते संशोधन कार्याचा संबंधात घेतलेल्या निर्णय प्रक्रियेला संशोधन आराखडा म्हणतात.

संशोधन दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व दैनिक प्रजावाणी व च्या २०२३ ते २०२४ च्या बातम्या च्या तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे त्यासाठी बातमीपत्र ग्रंथालय मुलाखती, संरक्षण इत्यादी तंत्रांचा वापर करण्यात आलेला आहे या आराखड्यानुसार तथ्य संकलनासाठी प्रश्नावली मुलाखत नमुना निवड इत्यादी तंत्रांची निवड केली आहे. प्रस्तुत विषयाची संशोधन निर्दोषपणे होण्यासाठी वस्तुनिष्ठ दृष्टी ठेवली आहे. त्यामध्ये पूर्वग्रह, गैरसमज पक्षपात इत्यादी गोष्टींचा अभाव आहे.

अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा :

जेव्हा संशोधनाचा उद्देश कोणत्या समाजातील घटनेमध्ये अंतर्भूत असणाऱ्या कारणाचा शोध घेणे हा तेव्हा अशा संशोधनासाठी तयार केल्या जाणाऱ्या आराखड्याला अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक आराखडा असे म्हणतात.

प्रकरण तिसरे : मराठी वृत्तपत्राततिल महिला विषयक वार्तांकन :

महिला अत्याचार संकल्पना व स्वरूप असे असून या प्रकरणात भारतीय समाज व स्त्रियांचे स्थान व दर्जा या मध्ये ऐतिहासिक प्राचीन समाजातील स्त्रियांचे स्थान व दर्जा वैदिक कालखंड (इ.स. पूर्व ६०० वर्षा पर्यंत) मध्ययुगीन कालखंड(इ.स. १२०० ते १८००) मध्ययुगीन सामाजात (मोगल पेशवाई) महिलांचे स्थान व हिंसा, शिवकालीन व पेशवेकालीन कालखंड (इ.स १७००-१८००), ब्रिटिश कालखंड(इ.स १७६५ ते १९४७), स्त्रियांचे हक्क आणि भारतीय संविधान यामध्ये ते संविधात स्त्रियांसाठी कोणकोणते कायदे आहेत याचा अभ्यास करण्यात आला, विविध धर्मात स्त्रियांचे सामाजिक व धार्मिक स्थान यात बौद्ध धर्मातील स्त्रियांची स्थिती, ख्रिस्ती धर्म, इस्लाम धर्म, जैन धर्म इत्यादींचा

समावेश आहे. तसेच आधुनिक भारतातील स्त्रियांचे स्थान स्त्रियांवरील अत्याचार यांचे प्रकार यामध्ये शारीरिक शाब्दिक हिंसाचार ,आर्थिक हिंसाचार लेंगिक हिंसाचार इत्यादी मुद्द्यांचा सविस्तर आढावा घेतला आहे. भारतातील स्त्रियांवरील हिंसाचाराचे स्वरूप यामध्ये स्त्रीवरील हिंसेचे दोन पैलू आहेत . समाजात उघडपणे होणारे आणि घराच्या भिंती आणि दरवाजाआड होणारे अत्याचार समाजात स्त्रियांची होणारी अवहेलना , स्त्रियांना पळवून नेणे, बलात्कार करणे यासाठी त्यांची विक्री करणे.

समाजात घराबाहेर होणारे अत्याचार तर घरात होणारे अत्याचार तितकेच हिंसक असतात. भारतातील कौटुंबिक हिंसाचाराची आकडेवारी त्यामध्ये नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो तर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या क्राईम इन इंडिया- २०१८ मध्ये महिला अत्याचारांचे एकूण तीन लाख ७८ हजार २७७ गुन्हे नोंदविण्यात होते २०१७ मध्ये तीन लाख ५९ हजार ८४९ गुन्हे नोंदविण्यात आले होते शिवाय २०१६ मध्ये तीन लाख ३८ हजार ९५४ गुन्हे नोंदविण्यात आले होते इत्यादी मुद्यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

महिलांवरील अत्याचार व मराठी वृत्तपत्र :

या प्रकरणात महिलांवरील अत्याचारांचा इतिहास या भागात अगदी पुरातन काळापासून महिलांवरील अत्याचारांच्या इतिहास यांचा मागोवा घेतला आहे. महिला अत्याचाराचे स्वरूप सांगताना स्त्रीवरील अत्याचारचे स्वरूप वेगवेगळ्या प्रकारचे तरी त्या अत्याचारात सर्वाधिक भयंकर अत्याचार हे लैंगिक स्वरूपाचे असतात भारतीय समाजात स्त्री या वरील अत्याचार यांचा इतिहास खूप मोठा आहे एक उपभोग्य वस्तू या दृष्टीने स्त्रीकडे पाहण्याचा येथे सन २०१२ साली झालेल्या दिल्लीतील निर्भया प्रकरणाने भारतातील समाजातील लैंगिक हिंसकता अधोरेखित झाली आहे. स्वातंत्र्योत्तर महिला अत्याचार प्रतिबंधक कायदे त्यामध्ये राजाराम मोहन रॉय यांच्या पाठपुराव्यामुळे १८२९साली सतीबंदीचा कायदापासून तर आता २०१३ च्या स्त्रीवरील हिंसाचार वीरोधी नवीन कायदा

म्हणजे दंड विधानातील संशोधित कायदा इथपर्यंत सर्व कायद्यांच्या थोडक्यात आढावा घेतला आहे तसेच कौटुंबिक हिंसाचार कायदा आणि प्रसारमाध्यमांची भूमिका इत्यादी मुद्दे यांचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

स्त्रीचे सामाजिक स्थान अभ्यासातुन स्त्री अत्याचारांचा अर्थ स्पष्ट करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे स्त्रिया हिंसाचाराच्या शारीरिक मानसिक अत्याचारांचा प्रकाराच्या व्याख्या करून स्त्री अत्याचाराची कारणे शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे स्त्री अत्याचाराच्या कारणान बरोबरच स्त्री अत्याचाराचे स्वरूप तसेच स्त्रीवरील अत्याचारांची सद्द:स्थिती मांडण्यात आलं आहे स्त्रीयांच्या शारीरिक व मानसिक छळ, बलात्कार घटस्फोट, वेश्याव्यवसाय कुमार माता, आदी समस्या यांचा सविस्तर अभ्यास मांडून स्त्री विरोधी अत्याचार ही संकल्पना स्पष्ट करण्यात आहे.

प्रकरण चौथे : दैनिक लोकमत, दैनिक सकाळ आणि दैनिक प्रजावणी मधील महिला विषयक वार्तांचे आशय विश्लेषण :

या प्रकरणात असे असून त्यामध्ये आशय विश्लेषण म्हणजे काय? आशय विश्लेषणच्या व्याख्या ? आशय विश्लेषणाचे स्वरूप , आशय विश्लेषण याचे महत्त्व इत्यादी स्पष्ट करून दैनिक लोकमत, दैनिक सकाळ आणि दैनिक प्रजावाणी या वृत्तपत्रांनी २०२३ ते २०२४ या कालावधीतील महिलाविषयक वार्तांकन केलेल्या जागेचे संख्यात्मक आशय विश्लेषण व महिला विषयक वार्तांकन, दिलेले स्थान, त्यांच्या संस्था संख्यात्मक विश्लेषण करणार आहे. तसेच प्रजावणी या वृत्तपत्राने २०२३ ते २०२४ या कालावधीत महिला विषयक वार्तांना दिलेले स्थान त्यांचे संस्था संख्यात्मक असे विश्लेषण करणार आहे. महिला हिंसाहाराचे साधारण चार प्रकारात वर्गीकरण करण्यात आले जसे की

१) शारीरिक छळ : थोबाडीत मारणे मारहाण करणे, लाथा मारणे, भिंतीवर आपटणे ई .

२) मानसिक छळ: घालून पाडून बोलणे, आपमान, चेष्टा करने मूल न होणे, हुंडा न आणणे, आत्महत्येची धमकी देणे इत्यादी.

३) आर्थिक छळ: माहेरून पैसे आणायला सक्ती करणे, हुंडा मागणे , पैशाच्या स्वरूपात किंवा दागिन्यांच्या स्वरूपात आर्थिक मागणी करणे.

४) लैंगिक छळ : सक्ती ने समागम करणे, अश्लिल चित्रे किंवा चित्रण पाहण्याची सक्ती करणे.

दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व दैनिक प्रजावणी या वृत्तपत्राच्या मुख्य अंकातील महिलांच्या अत्याचार विषय वार्तांचे वरील चार प्रकारात वर्गीकरण करण्यात येणार आहे. या सर्व हिंसाचाराच्या बातम्या ची लांबी x रुंदी = त्या बातमीचे चौरस क्षेत्रफळ काढण्यात येणार आहे. त्याची तालिकेच्या स्वरूपात मांडणी करणार आहे. प्रत्येक महिन्यात विषयानुसार बातम्या ची संख्या आणि क्षेत्रफळ काढून त्यांची टक्केवारी काढण्यात येणार आहे. यावरून महिला विषयक वृत्तपत्राने किती टक्के जागा दिली एका महिन्यात किती बातम्यांना प्रसिद्ध दिली ते लक्षात येते.

प्रकरण पाचवे : सामाजिक पाहणीचा अहवाल :

असे असून या प्रकरणांमध्ये सामाजिक सर्वेक्षणाचा अर्थ सांगून सर्वेक्षण पद्धतीचे फायदे व मर्यादा इत्यादी मुद्दे स्पष्ट केले आहेत सर्वेक्षणाचे क्षेत्र हे नांदेड जिल्हा असल्यामुळे या प्रकरणात नांदेड जिल्ह्याची थोडक्यात ओळख सांगितली आहे . संशोधनासाठी एक तीस प्रश्नांची प्रश्नावली तयार करून ती यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने वृत्तपत्राच्या वाचकांकडून ३०० प्रश्नावल्या भरून घेण्यात येणार आहेत. ज्या स्त्रियांवर कौटुंबिक हिंसाचार झाला अशाच महिलांकडून ६० प्रश्नावल्या भरून घेतल्या जाणार आहेत. तसेच जे सर्वेक्षण केले त्याचा अहवाल तयार करण्यात येईल. उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीचे

विश्लेषण करून प्रथम तालीकेच्या स्वरूपात त्यांची आकडेवारी तयार केल्या नंतर तिच माहिती आलेखाच्या स्वरुपातही सादर करण्यात येईल.

प्रकरण ६ : निष्कर्ष व सूचना :

संशोधन प्रबंधाचे हे अखेरचे प्रकरण अत्यंत महत्त्वाचे असून निष्कषात्मक स्वरूपाचे आहे. त्यामध्ये मागील सर्व पाच प्रकरणाच्या अनुषंगाने सारांश स्वरूपात मांडणी केली जाणार. तसेच प्रस्तुत विषयावरील प्राथमिक संशोधनातून निघालेल्या निष्कर्ष या प्रकरणांमध्ये स्पष्ट मांडण्यात येतील. तसेच या विषयावर आलेल्या सूचना या प्रकरणात मांडण्यात येतील प्रकरणाच्या शेवटी उपसंहार घेतला जाईल.

<u>संदर्भग्रंथ सुची :</u>

१) आपटे मीनाक्षी (ऑक्टोबर २००४) "शोध बाई माणसाच्या जिण्याचा " अक्षर प्रकाशन, प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्रमांक २४२.

२) केळकर मीना (सप्टेंबर १९९०) "भारतीय स्त्री, संकल्पना आणि प्रतिमा" निर्मित प्रकाशन, पुणे पृष्ठ क्र. ४५.

३) साने गीता (ऑगस्ट १९९७) "भारतीय स्त्री जीवन" मौज प्रकाशन गृह, प्रकाशक श्री. पु . भागवत, मुंबई पृष्ठ क्रमांक ४२.

४) भागवत विद्युत (२०१३) "विकास लिंगभाव परिक्षेत्रातुन स्वैर अनुवाद" प्रकाशक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे प्रकाशन, पृष्ठ क्रमांक २४०-२४१.

५) साठे निर्मला (२००७) "लिंगभाव आणि पंचायत राज प्रशिक्षण साहित्य संच" आलोचना प्रकाशन, स्त्रीविषयक संग्रहक संशोधक केंद्र, पुणे पृष्ठ क्रमांक ३२.

६) गोटे - गव्हाणे शुभांगी (२००३) "स्त्री परिवर्तनाची आव्हाने " साऊथ एडिशन सोशल रिसर्च पब्लिकेशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती.

७) साळुंके आ. ह., " हिंदू संस्कृती आणि स्त्री " प्रकाश विश्वासराव लोकवाड्मय प्रकाशन मुंबई.

८) लांजेवार ज्योती (मार्च २००५), "भारतीय समाज आणि स्त्री"

९) सुगावा प्रकाशन, प्रकाशक उषा वाघ, पुणे , पृष्ठ क्रमांक २९.

संशोधिका
अश्विनी शामराव केवटे
एम. जे. एम. एस., एम. फील. (मीडिया स्टडीस)

मार्गदर्शक
प्रा. डॉ. सुहास दुर्गादासराव पाठक
(सहयोगी प्राध्यापक)
माध्यमशास्त्र संकुल
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.